I J R S S I S, Spl Issue (III), July-2020 : 333-337
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# साथीचे रोग मानवजातीवरील परिणाम

O. M. Gajbhiye
M.E.S. College of Arts-Commerce, Mehkar, Dist. Buldhana.
*Corresponding Author: omrajgajbhiye.og@gmail.com

**सरांश :**

मानवजातीच्या संपूर्ण इतिहासात अनेक वेळा साथींच्या रोगांचा प्रादर्भाव झालेला दिसून येतो. साथीच्या रोगांच्या उद्भव अनेकदा विषाणूंपासून होतो. हे विषाणू मानवाला प्रचंड घातक ठरलेले दिसून येतात. विषाणूंपासून उद्भवणाऱ्या साथीच्या रोगांनी प्राचीन काळापासून मानवी इतिहासावर मोठे परिणाम कलेले आढळतात. इ.स.पूर्व काळापासूनच्या साथीच्या रोगांच्या व त्याच्या दुष्परिणामाच्या नोंदी जगातील अनेंक राष्ट्रात आढळून येतात. सिरका,प्लेग,ॲटोनियन प्लेग, सायप्रीयन प्लेग, फ्लु,पोलीयो,स्पॅनीष फ्लू,एषियन फ्लू,एडस स्वाइन फ्लू, इबोला,सार्स,मर्स झीका व कोरोना यासारख्या साथीच्या रोगांनी मानवाच्या सर्वांगीन जीवनावर व व्यवस्थांवर अत्यंत दूरगामी परिणाम केलेले आहेत. या रोगामुळे सामाजिक,राजकीय,आर्थिक,परिणामाबरोबरच मानवी मनोदषेवरही विपरित परिणाम झाले. अनेक राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था उध्वस्त झाल्या. मोठमोठी राजघरानी सुध्दा उध्वस्त झाली. राजकिय व सामाजिक उलथापालथी झाल्या.

कोटयावधी लोकांचे जीवन उध्वस्त करणाऱ्या या साथीच्या रोगांचा उद्भव मानवी संस्कृतीने सातत्याने सहन केलेला आहे. अत्यंत बुध्दीमान व शक्तीषाली समजल्या जाणाऱ्या मानवाला अनेकदा न दिसणाऱ्या विषाणूने हतबल करून टाकले अनेकदा दैवी कोप म्हणून या संकटाकडे पाहिले गेले. गावे आणि शहरे ,गरीब आणि श्रीमंत असा भेद न करणाऱ्या साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव पषु–पक्षांपासून होतो असा आतापर्यंत समज होता. परंतु कोरोनाचा प्रादुर्भाव झाल्यानंतर मात्र साथीच्या रोगाचे विषाणु प्रयोगषाळेत विकसित केले जाऊ शकतात असेही दिसून आले आहे. हे मानवनिर्मिती विषाणू पुढील काळात अधिक विनाषकारी ठरून त्यापासून संपुर्ण मानव जातीला व सजीवसृष्टीलाही मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता बळावलेली आहे. मानवी प्रगतीबरोबरच मानवानेच निर्मिलेला विषाणू मानवाचेच अस्तित्व नष्ट करेल की काय अषी चिंता आता भेडसावू लागलेली आहे. त्यामुळे अषा प्रकारच्या साथीच्या रोगांबाबत मानवाने अधिक सतर्क राहण्याची आता गरज आहे.

**बिजशब्द** : साथींचे रोग, परिणाम, भविष्यकालीन सतर्कता, मानवजात

**प्रस्तावणाः–**

प्राचीन काळापासून जगाच्या वेगवेगळया प्रदेषात मानवाने वस्ती करून रहावयास प्रारंभ केला. त्या त्या प्रदेषात अनेक संस्कृत्यांचा उदय झाला. निसर्गाच्या व विविध पशु–पक्षांच्या सानिध्यात राहून मानवाने हळु हळू प्रगतीच्या दषिने वाटचाल केली. आपले सामाजिक सांस्कृतिक व आर्थिक जीवन विकसित केले. अन्य पशु–पक्षांच्या तुलनेत मानवाने केलेल्या या प्रगतीमुळेच निसर्गातील सर्वांत बुंध्दिमान व शक्तीषाली सजीव म्हणून मानव ओळखला जाऊ लागला. नैसर्गिक संसाधनांचा वापर करून मानवाने अन्य सजीवसृष्टीवर आपले वर्चस्व प्रस्थापीत करण्यात यश मिळविले. नवनवीन संस्कृत्या ,धर्म,साम्राज्ये व सामाजिक व्यवस्था निर्मान केल्या – परंतु प्रबळ ,पराक्रमी,निडर आणि बुध्दिमान असलेला मानव अनेकदा हतबल ठरला हाही इतिहास आहे. विशेषतः विषाणू अन्य साथीच्या रोगांपुढे मानवाची हतबलता वारंवार स्पष्ट झालेली दिसून येते. एकीकडे नवनवीन वैज्ञानिक शोध लागत असतानाच दुसरीकडे मात्र साथीच्या रोगांना कायमचा अटकाव घालणे

मानवाला शक्य झाले नाही हा इतिहास आहे. एखाद्या साथरोगावर नियंत्रण मिळवित असताना दुसऱ्या साथरोगाचे संकट पुन्हा–पुन्हा उद्‌भवलेले दिसून येते. अगदी प्राचीन काळापासूनच मानवाने साथीच्या रोगांची अत्यंत विनाषकारी झळ सोसलेली आहे. अषा काही विषाणूच्या रोगांवर मानवाने मातही केली पण लाखो लोकांचा बळी देउनच ते शक्य झाले संपूर्ण मानवी जीवनावर अत्यंत विघातक परिणाम करणारे हे साथीचे रोग हा प्रश्न नुकत्याच उद्‌भवलेल्या कोरोना या विषाणूजन्य रोगामुळे चर्चिला जातो आहे.

**गृहितके:–**

1. साथीच्या रोगांना प्राचीन काळापासून प्रारंभ झाला.
2. साथीचे रोग विषाणूजन्य असतात.
3. पषु– पक्षांच्या सानिध्यामुळे साथ रोग पसरतात.
4. साथरोगांचे मानवावर विनाषकारी परिणाम होतात.

**साथीच्या रोगांची ऐतिहासीक पार्श्वभूमी:–**

जीणिवेची जाणीव असणारा सजीव म्हणजेच होमो सेपीयन सेपीयन (हुषार व बुध्दिमान½ समजला मानव सर्वच नैसर्गिक परिसंस्थावर व अन्य सजीवांवर मात करून प्रगतीच्या षिखरावर पोहोचला. ही प्रगती साध्य करण्यास मानवाला हजारो वर्षे लागली. पृथ्वीवरील संसाधने व जैवविविधतेचा वापर करून मानवाने सजीवसृष्टी वर आपले अधिराज्य निर्माण करण्यात यष मिळविले सामाजिक राजकिय आर्थिक लष्करी व अन्य व्यवस्थांनी भक्कम निर्मिती मानवाने केली. जगात अनेक उलथापालथी मानवी सहभागातून घडून आल्या असे असले तरी मानवाला प्राचीन काळापासून अत्यंत घातक अषा साथीच्या रोगांचा समूळ नायनाट करण्यात पुरेषे यष आलेले दिसून येत नाही. एखाद्या प्रदेषात किंवा राष्ट्रात उद्‌भवले अषी नोंद आढळून येते. इ.स.पू 3000 मध्ये सिरका हे नाव असलेला साथरोग उद्‌भवला होता. विषेष म्हणजे या रोगाचा प्रादुर्भाव उत्तरपुर्वचीनच्या प्रदेषातच झाला होता. हमीन मंद्या या पुरातात्वीक भागातील उत्खननातून साथरोगाच्या प्रादुर्भावाची माहिती उपलब्ध होते. लहान मुले तरूण व वृध्द या सर्व वयोगटातील लोकांना या रोगाची लागण झाली होती. हमीन मंद्या प्रमाणेच साथरोगाने मृत्यू झालेल्या लोकांची सामुहिक दफनभूमी मीयानझींग या चिनी प्रदेषातच सापडलेनली आहे. सीरका नंतर ग्रीक प्लेग ॲटोनीयन प्लेग,सायप्रीयन प्लेग,जस्टीनीयन प्लेग, ब्लेकडेथ या सारख्या साथीच्या रोगांनी प्राचीन काळी मानवी जीवन उध्वस्त केले होते असे दिसून येते.

**साथीचे प्रमुख रोग:–**

साथीच्या रोगाच्या व्यापकतेवरून त्याला सांबोधनले जाते. एखाद्या नगरात प्रांतात अथवा देषातच साथरोगाचा प्रादुर्भाव व प्रसार मर्यादित असेल तर त्यांला 'एपीडेमिक ' म्हटले जाते परंतु साथ रोगाचा प्रसार अनेक राष्ट्रात व खंडात होत असेल तर त्या साथरोगाला 'पॅडेमिक' म्हटले जाते. एपीडेमिक व पॅडेमिक प्रकारातील अनेक साथरोगांचा उद्‌भव प्राचीन काळापासून झालेला आहे. नुकताच उद्‌भवलेला कोरोना हा पॅडेमिक प्रकार म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. कोरोनाचा वेगाने होणारा प्रसार व त्याची घातकता यामुळेच कोरोनाला जागतीक महामारी म्हटले

जात आहे. दोन्ही प्रकारच्या या साथ रोगाचं मानवावर मोठे परिणाम झालेले आहेत. कोटयावधी लोकांचे बळी होणाऱ्या या साथरोगांमध्ये प्रामुख्याने खालील साथरोगांचा समावेष होतो.

1. सिरका :— इ.स.पू. 3000 च्या सुमारास चीनमध्येच उद्भवलेल्या या साथ रोगाने हजारो नागरिकांचे बळी घेतले होते असे पुरातात्वीक अवषेषांवरून व सामुहिक दफनभूमीवरून निदर्षनास येते. सिरका हा रोग चीनच्या अत्तरपूर्व प्रांतात मोठया प्रमाणात पसरलेला होता.

2. ग्रीक प्लेगः— ग्रीक प्लेग अथेंस प्लेग म्हणून हा साथरोग ओळखला जातो. जवळपास एक लाख लोकांचे बळी घेणाÚया या रोगाविषयी भुसीडीडीस या तत्वज्ञाने नोंदी घेतलेल्या आहेत. या प्लेगचा परिणाम मानवी जीभ,डोळे,घसा,डोके यावर होऊन रक्तस्त्रव होत असे व त्यामुळे मृत्यू होत असे.

3. ॲटोनियन प्लेगः— स्मालपॉक्स प्रमाणे असलेला हा साथरोग रोमन साम्राज्याच्या सैन्याच्या द्वारे पसरला होता. इ.स.165 ते 180 या काळात उद्भवलेल्या या साथरोगाने जवळपास पन्नासलाख लोकांचा बळी घेतलेला होता. तत्कालीन काळातील हा सर्वाधिक घातक प्लेग मानला गेला. हा आजार देवी किंवा गोवर या प्रकारातील असावा.

4. सायप्रियन प्लेगः— टयुनीषीया या राष्ट्रातील चर्च बिषप सेंट सायप्रीयन यांचे नाव या प्लेगला देण्यात आले या प्लेगमुळे मानवजात नष्ट होइल की काय अषी भिती व्यक्त करण्यात येत होती. कारण दररोज एकटया रोम शहरात पाच हजारपेक्षा अधिक लोक मृत्यूमुखी पडत होतेः

5. जस्टीनीयन प्लेगः— बीझांटीन साम्राज्याचा सम्राट जस्टीनीयन याच्या नावावरून या प्लेगचे नाव पडले. इ.स.541—42 च्या सुमारास आलेल्या या साथरोगामुळे किमान दहा टक्के मानवजात मृत्युमुखी पडेल अषी भिती व्यक्त करण्यात आले होती. पष्चिम युरोपबरोबरच मध्यपुर्वेच्या प्रदेषातही या रोगाचा प्रसार झाला होता.यात काखेत व जांघेत गाठी येत असत.

6. ब्लॅक डेथ :— हा साथ रोग आषियाखंडातून युरोपात सपरला या रागाने युपरोपचे भवितव्यच बदललून टाकले. जवळपास अर्ध्यायुरोपवर घातक परिणाम करणारा ब्लॅकडेथ हा साथ रोग त्या काळापर्यंतचा सर्वाधिक विनाषकारी मानला जातो. चौदाव्या शतकातील या रोगाने किमान वीसकोटी लोकांना प्रभावीत केले.

7. अमेरिकन प्लेगः— स्मालपॉक्स प्रमोच असलेला हा प्लेग युरोपीयन लोकांनी अमेरिकेत नेला. इंग्लंड ,फ्रान्स स्पेन,पोर्तुगाल च्या दर्यावर्दीनी अमेरिकेत या प्लेगचा प्रसार केला होता. उदरांपासून हा रोग पसरत असे.

8. लंडन प्लेगः— इ.स. 1665 मध्ये उद्भवलेल्या लंडन प्लेगने ब्रिटीष साम्राज्याला मोठा हादरा दिला. ब्लॅक डेथ प्रमाणेच या रोगाचे घातक रूप ब्रिटीषांनी अनुभवले . या साथ रोगाने एकटया लंडनमधील एक लाख लोकांचा बळी घेतला होता.

9. एषियाटिक फ्ल्यु :— इ.स. 1889—90 च्या सुमारास हा साथरोग पसरला याला रषियन फ्ल्यु असेही म्हटले जाते. हा विषाणू एच 3 एन 8

होता. या फ्ल्युचा झपाटयाने प्रसार होहुन किमान दहालाख लोक मृत्युमूखी पडले.

10. स्पॅनीष फ्ल्यु:— इ.स.1918 ते 1920 या कालावधीत उद्‌भवलेल्या हया फ्ल्युने सर्वारधिक मनुष्यहानी केली. या फ्ल्युची पहिली लागत चिनमध्येच झाली होती. विषेष म्हणजे ज्यांची प्रतिकार क्षमता चांगली असते असाही वर्ग या फ्ल्युला बळी पडला. स्पॅनीष फ्ल्युचा जगात सर्वत्र प्रसार झाला. त्यामुळे पाच कोटी पेद्वाा अधिक लोक दगावले दृ

11. अन्य साथीचे रोग:— कॉलरा,देवी, पटकी,एड्‌स, मर्स, डेंग्यु, चिकनगुणीया, सार्स, इबोला, निपाह, झीका, मलेरिया, मम्प, इन्फ्ल्युएंझा, स्वाइन फ्ल्यु, यासारखे अनेक साथीचे रोग जगामध्ये उद्‌भवलेले आहेत . या साथ रोगांनी मानवी जीवन ढवळून काढले. या रोगांवर काही प्रमाणात मात करण्यात मानवाने यष मिळवले असले तरी या रोगांमुळे फार मोठी मनुष्यहानी घडून आली होती हे नाकारता येत नाही.

12. कोरोना :— 2019 च्या शेवटी चिनमध्येच उद्‌भवलेल्या कोरोना या जागतीक महामारीचा सामना आज संपूर्ण जगाला करावा लागतो आहे. एकवीसाव्या शतकातील सर्वाधिक परिणाम कारक व घातक विषाणुजन्य आजार म्हणून कोरोना ओळखला जातो. अनेक साथीचे रोग दुषीत पाणी प्रदुषण किंवा पषुपक्षांपासून पसरले होते. परंतु कोरोना हा मानवनिर्मिती विषाणु असावा असा संषय व्यक्त करण्यात येतो. कोरोनामुळे जागतिक व्यवस्थेवर, व मानवावर फार मोठे विनाषकारी परिणाम होत आहेत. हे परिणाम दिर्घकालीन असू शकतात असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

साथरोगांचे मानवावरील परिणाम:— प्राचीन काळापासून उद्‌भवलेल्या साथीच्या रोगांचे अनेक दुष्परिणाम मानवाला भोगावे लागले आहेत. प्रत्येक साथीच्या रोगाने हजारो लाखो लोकांचा बळी गेलेला आहे. पण त्याचबरोबर मानावने उभ्या केलेल्या सामाजिक, सांस्कृतिक ,आर्थिक व राजकिय व्यवस्थाही कोलमडून पडल्या आहेत. दारिद्रय उपासमार, महागाई, उन्नधान्याची टंचाई बेकारी या समस्या या रोगराईने अधिक तीव्र केल्या कोटयावधी लोक त्यामुळे प्रभावीत झाले. अनेक कुटुंबे उध्वस्त झाली. मानवी आरोग्यावर त्याचे दिर्घ परिणाम झाले. रोगराईच्या भीतीमुळे सर्व यंत्रणा ठप्प झाल्या. मानवाला घरातच बंदीस्त जीवन जगण्याची वेळ आली. एकीकडे अभावग्रस्ताता आणि दुसरीकडे रोगराईची भीती याचा परिणाम मानवाच्या मनः स्थितीवर होउ लागला. अनेकांचे मानसिक स्वास्थ्या बिघडले नैराष्यग्रस्तता वाढली कौटुंबिक जीवनावरही त्याचे विपरित परिणाम दिसून आले. कोरोनाच्या या नव्या साथरोगामुळे तर मानवावर होणारे परिणाम अधिक ठळकपणे दिसू लागलेले आहेत. त्यामुळे भविष्यातील मानवाजात सुरक्षीत व सुखरूप ठेवण्यासाठी अषा प्रकारच्या साथरोगांना प्रतिबंध घालण्यासाठी उपाययोजना करणे हे अधिक आवष्यक झालेले आहे.

**निष्कर्ष :**

1. साथीचे रोग हे अधुनमधुन उद्‌भवत असतातच
2. साथीच्या रोगांमुळे लाखो लोकांचा बळी जातो.

e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

3. साथीच्या रोगांमुळे मानवी जीवनावर घातक परिणाम होतात.

4. साथीच्या रोगांना अटकाव करणे अत्यावष्यक आहे.

**संदर्भ :**

कुबेर गिरीष – युध्द जीवांचे राजहंस प्रकाषन

काणे वसंत गणेष– जगातील साथीचे रोग आणि रोगांच्या साथी (तरून भारत 18 फेब्रवारी 2020)

चंदन सेनगुप्ता – सांस्कृतिक हिंसा : कोरोना महामारी के संदर्भ मे जगतिक स्तर की अस्थिरता (Kindle Form)

Daniel Defoe –A Journal of the plague year

Camus Albert- The plague (Kindle Form)

Acmilleln Christian w. – Pandemics: A very short Introduction (Kindle Format)